साप्ताहिक

# परळी परिसर

Post Reg.No.LSB/BEED/RNP-265 / 2026-2028

* परळी वैजनाथ * मंगळवार, दि. ०६ जानेवारी २०२६ * पाने-६ * २/-₹ www.parliparisar.com



आचार्य बाळशास्त्री जांभेकर

दर्पण दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

- संपादक

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीदिनी नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी घेतला पदभार

## परळी नगर परिषदेच्या कामाची इतिहासात नोंद होईल असे काम करून दाखवू - आ.धनंजय मुंडे यांची ग्वाही

## परळीच्या विकासाला नवी गती देण्याचा प्रयत्न करू-सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळीकरांनी या निवडणुकीत महायुतीच्या बाजूने अभूतपूर्व ऐतिहासिक विजय आम्हाला दिला आहे. ना.पंकजाताई असो किंवा आपण स्वतः सातत्याने परळीच्या विकासाचे स्वप्न पाहिले आहे. तेच स्वप्न परळीकरांच्या समोर मांडले आहे. विकासाच्या बाजूने कौल देत परळीकरांनी ऐतिहासिक विजय दिला आहे. परळीकरांना दाखवलेली सगळी स्वप्नं पूर्ण करण्याच्या दृष्टिकोनातूनच ही नगरपरिषद काम करणार आहे. २०२५ च्या नगर परिषदेच्या कामाची इतिहासात नोंद होईल अशा पद्धतीचे काम करून दाखवू अशी ग्वाही माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी दिली.

ना. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी कॉंग्रेस व महायुतीच्या अधिकृत उमेदवार म्हणून प्रचंड मताधिक्याने विजयी झालेल्या परळी नगर परिषदेच्या थेट लोकनिर्वाचित नगराध्यक्ष सौ. पद्मशीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी आज आ. धनंजय मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीदिनी पदभार स्वीकारला. यावेळी नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने नवनिर्वाचित नगराध्यक्षा व नगरसेवकांचा औपचारिक सत्कार समारंभही आयोजित



करण्यात आला होता. ढोल ताशांच्या गजरात व नगरपरिषद इमारतीला पुष्पसजावट करून, आकर्षक स्वागत सोहळा यावेळी पार पडला. आ. धनंजय मुंडे यांच्या हस्ते नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. पद्मशीताई बाजीराव धर्माधिकारी व सर्व नगरसेवकांना कर्तव्यपुस्तिका प्रदान करून पदभार देण्यात आला. त्याचबरोबर सर्वांना फेटे बांधून शाल व पुष्पगुच्छ देऊन सर्वांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी पुढे बोलताना आ. धनंजय मुंडे यांनी सांगितले की, परळी नगरीच्या नगराध्यक्ष पदाचा कारभार एक महिला आज क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीच्या दिवशीच जबाबदारी घेत आहे. त्याचबरोबर यावेळी नगरपरिषदेमध्ये महिलांची संख्या लक्षणीय असून खऱ्या अर्थाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या समानतेचे तत्व इथे लागू झाले आहे. परळीकर मायबाप जनतेने महायुतीच्या बाजूने अभूतपूर्व यश दिले आहे. खरे तर २०१२ पासून आपण ही नगरपरिषद चालवत आहोत. २०१२ पासून आज पर्यंत परळीकर नागरिकांना नगरपरिषदेने एक रुपयाच्याही करांमध्ये वाढ केलेली नाही. नागरिकांवर कुठलाही बोजा न टाकता मोठमोठी महत्त्वाकांक्षी कामेही परळीत उभी राहिली आहेत. नवीन वाढलेल्या वस्त्यांमध्ये काही ठिकाणी रस्त्यांचे प्रश्न असून तातडीने तेही पूर्ण केले जातील. ना.पंकजाताई आणि आपण स्वतः शासन दरबारातून निश्चितच परळीच्या चौफेर विकासासाठी आवश्यक तो सर्व निधी खेचून आणू. परळीकर जनतेला विकासाची जी स्वप्नं आपण दाखवली ती प्रत्यक्षात साकार करण्यासाठी येणारा काळ महत्त्वाचा ठरणार आहे. त्यामुळे आजपर्यंतच्या इतिहासात २०२५ ची ही नगरपरिषद कौन्सिल आपल्या कामाने इतिहासात नोंदवली जाईल अशा पद्धतीचे आपण काम करून दाखवू अशी ग्वाही आज धनंजय मुंडे यांनी यावेळी दिली.

**परळीच्या विकासाला नवी गती देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करू - सौ.पद्मशीताई बाजीराव धर्माधिकारी**- यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना नगराध्यक्षा सौ. पद्मशीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी तमाम परळीकरांचे जाहीर आभार व्यक्त केले. त्याचबरोबर आज क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीदिनी आपण नगराध्यक्षा म्हणून पदभार घेतला ही खूप मोठी जबाबदारी आहे याची आपल्याला जाणीव असल्याचे सांगितले. आ. धनंजय मुंडे व ना. पंकजाताई मुंडे यांच्या खंबीर नेतृत्वाखाली निश्चितच परळीच्या विकासाला नवी गती आणि दिशा प्राप्त होणार आहे. परळीचा चौफेर आणि सर्वांगीण विकास करण्यासाठी सर्व सहकारी नगरसेवक, सर्व कार्यकर्ते, परळीकर जनता प्रशासनातील अधिकारी ,कर्मचारी या सर्वांच्या सहकार्याने आपण



परळीला एका नव्या विकासाच्या उंचीवर घेऊन जाऊ. यासाठी सर्वांनी साथ आणि आशीर्वाद द्यावेत असे आवाहन करून विकासाला नवी गती देण्याचा आपण नगराध्यक्षा म्हणून प्रामाणिक प्रयत्न करू अशी ग्वाही सौ. पद्मशीताई धर्माधिकारी यांनी यावेळी दिली.

**क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी**- दरम्यान, यावेळी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करून नवनिर्वाचित नगराध्यक्षा व नगरसेवकांनी आपला पदभार घेतला. क्रांतीज्योती

(उर्वरित पान ४ वर)

# सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक स्पर्धेत 'सा.परळी परिसर'चा तृतीय पुरस्काराने पुण्यात गौरव

पुणे (बातमीदार):- परळी वैजनाथ येथून नियमित प्रकाशित होणाऱ्या सा.परळी परिसरच्या यंदाच्या दिवाळी अंकाला सर्वोत्कृष्ट दिवाळी अंकाचा राज्यस्तरीय तृतीय पुरस्कार देऊन पुण्याच्या 'मराठबोली' संस्थेच्या वतीने गौरविण्यात आले आहे.

पुण्याच्या नवी पेठ भागातील गांजवे चौकातील पत्रकार भवनच्या सभागृहात रविवारी (ता.४) दुपारी पुरस्कार वितरणाचा हा सोहळा पार पडला. ज्येष्ठ साहित्यिक शरद अत्रे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास ज्येष्ठ साहित्यिक हेमंत परब हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी परमेश्वर उमरदंड, साहेबराव पवळे, संजय सोनवणे, सचिन कुरकुटे, वैशाली गावंडे, अॅड.रामचंद्र पाचूनकर, शिवाजी उराडे आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत हा गौरव करण्यात आला. शाल, श्रीफळ, गौरवपत्र, ग्रंथ देऊन हा गौरव झाला. सा.परळी परिसरच्या संपादक एस.एल.वाकडे, कार्यकारी संपादक ज्येष्ठ पत्रकार लक्ष्मण वाकडे, प्रा.स्नेहा पवळे, शुभम पवळे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी 'मराठबोली' संस्थेच्या वतीने आयोजित




काव्यवाचन, लेखनासह दिवाळी अंकाच्या राज्यस्तरीय पुरस्काराचे वितरण प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास शिवाजी भापकर, श्रीपाद टेंबे, तेजस्विनी आमले, रामेश्वर गोरे, भारत धंगेकर, युवराज गरूड, सुजाता बानगुडे, भारती सावंत, सीमा भांमरे, चंद्रकांत बोऱ्हाडे, कुसूम बोते, विजय खुटे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. या सोहळ्या दरम्यान झालेल्या काव्यवाचनात श्री लक्ष्मण वाकडे यांनी बालकुमारांच्या कविता सादर केल्या. त्यास उपस्थितांनी मोठी दाद दिली.

दरम्यान, गेल्या मे २०१७ पासून परळी वैजनाथ येथून साप्ताहिक परळी परिसर हे वर्तमानत्र नियमित प्रसिद्ध होत आहे. परळी परिसरातील आठवडाभरातील घडामोडींसह प्रत्येक अंकात नवा विषय आणि नवा विचार मांडणाऱ्या या वर्तमानपत्राने बीड जिल्ह्यात वर्तमानपत्राच्या क्षेत्रात अग्रगण्य स्थान मिळविले आहे. सर्वसामान्यांच्या प्रश्नाला न्याय देण्याची भूमिका कायम ठेऊन दरवर्षी दिवाळीला निघणाऱ्या वाचनिय व दर्जेदार दिवाळी अंकाची परंपरा साप्ताहिक परळी परिसरने आजपर्यंत जपली आहे. यंदाचा परळी परिसरचा नववा दिवाळी अंक होता. प्रत्येक दिवाळी अंकात नवा विषय घेऊन अंक वाचकांच्या हाती दिला जातो. वाचकांकडून अंकाचे भरभरून स्वागत होते. परळी परिसरच्या यंदाच्या दिवाळी अंकात परळी पालिकेच्या कारभारावर 'कव्हर स्टोरी' प्रसिद्ध केली होती. याशिवाय विविध विषयावरील लेख, कवीता, कथा, ललित, पुस्तक परिक्षण, मनोरंजन, नागरी समस्या आदी साहित्य या अंकात समाविष्ट होते. बहुरंगी व उत्कृष्ट मांडणी व दर्जेदार साहित्य यामुळे साप्ताहिक परळी परिसरचे दिवाळी अंक वाचकप्रिय ठरले आहेत. दिवाळी अंकाचा वाचकांनी सदैव गौरवच केला आहे.

मराठीबोली, पुणे या संस्थेने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय दिवाळी अंक २०२५ च्या स्पर्धेत साप्ताहिक परळी परिसरच्या यंदाच्या दिवाळी अंकाला तृतीय पुरस्कार मिळाला आहे. परळी सारख्या छोट्या शहरातून प्रसिद्ध होणाऱ्या दिवाळी अंकाची दखल घेऊन पुरस्कार मिळतो ही परळीतील वर्तमानपत्रांसाठी अभिमानाची बाब आहे. या यशाबद्दल साप्ताहिक परळी परिसरच्या संपादक एस.एल.वाकडे, कार्यकारी संपादक ज्येष्ठ पत्रकार लक्ष्मण वाकडे व सर्व सहकारी टीमचे अभिनंदन येथे पत्रकार व मित्र परिवारांनी केले आहे. दरम्यान, दिवाळी अंकाचे वाचक, वर्गणीदार, अंकाला सदैव साहित्य पाठविणारे लेखक, कवी तसेच जाहिरातदार, विक्रेते आदींचे या गौरवाबद्दल संपादकांनी आभार मानले आहेत. ***

## परळीत ६ जानेवारीला दर्पण दिन सोहळा रंगणार

# आ.धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत डॉ.वि.ल.धारूरकर यांचे व्याख्यान होणार

परळी वैजनाथ, (बातमीदार):- महाराष्ट्राचे माजी कृषिमंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवार, दि. ६ जानेवारी २०२६ रोजी परळी येथे दर्पण दिन कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात त्रिपुरा विद्यापीठाचे माजी कुलगुरू तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वृत्तपत्र विभागाचे सेवानिवृत्त विभागप्रमुख डॉ. वि. ल. धारूरकर यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले असल्याची माहिती परळी शहर व तालुका पत्रकार संघाच्या वतीने देण्यात आली आहे. हा कार्यक्रम परळी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील शासकीय विशेष अतिथी विश्रामगृहाच्या सभागृहात सकाळी ११ वाजता सुरू होणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार व माजी शिक्षण सभापती शंकराप्पा मोगरकर असणार आहेत.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना (शिंदे गट) बीड जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. टी. पी. मुंडे, उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) प्रदेश सरचिटणीस राजाभाऊ फड, परळी नगर परिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ.पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख, परळी औष्णिक वीज निर्मिती केंद्राचे मुख्य अभियंता सुनील इंगळे, काँग्रेस शहराध्यक्ष बहादूर भाई, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे, संभाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे, शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रघुनाथ नाचन, नायब तहसीलदार परवीन पठाण, अल्ट्राटेक सिमेंट फॅक्टरीचे जनसंपर्क अधिकारी कुलदीप खोब्रागडे, सामाजिक कार्यकर्ते अनंत इंगळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या दर्पण दिन सोहळ्यात नवनिर्वाचित नगराध्यक्षा व नगरसेवकांचा सत्कार करण्यात येणार असून, पत्रकारितेतील उल्लेखनीय योगदानाबद्दल विविध स्मृती पुरस्कारांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या दर्पण दिन कार्यक्रमास शहरातील व तालुक्यातील सर्व संपादक, पत्रकार तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष रानबा गायकवाड, नितीन ढाकणे, शेख मुकरम, संतोष जुजगर, अनुप कुसुमकर समीर इनामदार भगवान साकसमुद्रे, बालाजी जगतकर मिलिंद चोपडे बालासाहेब जगतकर, शेख मुदस्सीर, विकास वाघमारे, सय्यद सबाअत अली, बालाजी ढगे, सय्यद अफसर शेख बाबा, अमोल सूर्यवंशी, अतुल बडे, संपादक सुग्रीव शिरसागर, बाळासाहेब मुजमुले अशोक गलांडे, बाळासाहेब गरड रमेश लहाने नितेश काळे श्रीमंत खांडेकर, बापू किरवले, विद्याधर शिरसाठ डॉक्टर जे एन शेख सम्राट गायकवाड नवनाथ दाने, जावेद पठाण,अशोक जोगदंड केशव कांबळे आनंद तुपसमुद्रे यांनी केले आहे.✻

(पान १ वरून....) **नगराध्यक्षा सौ.धर्माधिकारी यांनी घेतला पदभार**

सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त महिला नगराध्यक्षा म्हणून एक महिला नगराध्यक्ष पदावर विराजमान झाली हा एक सुवर्णक्षण यावेळी बघायला मिळाला.

**संविधान प्रास्ताविकेचे अनावरण**- याप्रसंगी नगरपरिषद कार्यालय इमारतीमध्ये प्रवेशद्वारात दर्शनी भागावर संविधान प्रस्ताविकेची भव्य व आकर्षक कोनशीला तयार करुन बसवण्यात आली आहे. आ.धनंजय मुंडे यांच्या हस्ते व नगराध्यक्षा सौ.पद्मशीताई धर्माधिकारी व नगरसेवकांच्या उपस्थितीत या कोनशिलेचे अनावरण करण्यात आले.

**सर्व नगरसेवकांना कर्तव्यपुस्तिकेचे वितरण**- दरम्यान महाराष्ट्रात प्रथमच परळी नगरपरिषदेने सर्व नगरसेवकांसाठी मार्गदर्शक ठरेल, त्याचबरोबर नगरसेवकांचे अधिकार, कर्तव्ये, कायदेशीर माहिती, कामकाजाची माहिती, प्रशासकीय माहिती अशी संपूर्ण संकलित माहिती असलेली एक कर्तव्य पुस्तिका प्रकाशित केली आहे. या कर्तव्यपुस्तिकेचे विमोचन आ. धनंजय मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. त्याचबरोबर नवनिर्वाचित नगराध्यक्षा व सर्व नगरसेवकांना या कर्तव्यपुस्तिकेचे वितरण करण्यात आले. या समारंभाला नगराध्यक्ष सौ. पद्मशीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्यासह प्रभाग क्रमांक एक चे नगरसेवक आघाव वंदना अश्विनकुमार, मुंडे दीपक प्रल्हादराव, प्रभाग क्रमांक दोन चे नगरसेवक इंगळे कविता अनंत, अल्ताफ खान सरदार खान पठाण, प्रभाग क्रमांक तीन चे नगरसेवक सय्यद फारुख गणी, शेख आयेशा मोहसीन, प्रभाग क्रमांक चार चे नगरसेवक नितीन नामदेव रोडे, मीरा केशव नागरगोजे, प्रभाग क्रमांक पाचचे नगरसेवक सौ. जयश्री शंकरआप्पा मोगरकर, सोळंके वैजनाथ भानुदास, प्रभाग क्रमांक सहा चे नगरसेवक बनसोडे अंजली केशवराव, शिंदे व्यंकटेश बाबुराव, प्रभाग क्रमांक सात चे नगरसेवक केंद्रे अश्विनी राहुल, सारडा सचिन रामनाथ, प्रभाग क्रमांक आठ चे नगरसेवक रोडे अर्चना महेंद्र, इस्माईल मौला शेख ,प्रभाग क्रमांक ९ चे नगरसेवक कांबळे सुनील भाऊसाहेब, पठाण खैसर राजा खान, प्रभाग क्रमांक दहाचे नगरसेवक डावरे सरोजा गौतम, मुरकुटे लक्ष्मण जनार्दन, चाटे कुसुम अण्णासाहेब, प्रभाग क्रमांक ११ चे नगरसेवक रोडे महादेव नागनाथ, गीते जयश्री रवींद्र, प्रभाग क्रमांक १२मधील नगरसेवक कराड प्राजक्ता श्रीकृष्ण, मेनकुदळे योगेश विजयकुमार, प्रभाग क्रमांक १३ चे नगरसेवक बळवंत रेशमा केशव, लाहोटी शिल्पा जयपाल, प्रभाग क्रमांक १४ चे नगरसेवक मुंडे पवनकुमार महादेव, डॉ. पूजा प्रितेश तोतला, प्रभाग क्रमांक १५ चे नगरसेवक देशमुख प्रतीक्षा रणजीत, सय्यद फर्जाना बेगम सय्यद सादिक, प्रभाग क्रमांक १६ चे नगरसेवक कुरेशी आरेफाबेगम महबूब पाशा, बागवाले नितीन माणिक, प्रभाग क्रमांक १७ चे नगरसेवक पवार रूपाली रमेश, शेख अब्दुल रहमान हाजी बाबू अब्दुल रशीद यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. ✻✻✻✻


**निविदा सुचना**

**महाराष्ट्र शासन**

मृद व जलसंधारण विभाग,

आयुक्त, मृद व जलसंधारण, छत्रपती संभाजीनगर

प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, छत्रपती संभाजीनगर

जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, बीड

पत्ता :-जायकवाडी कॉलनी, नगर रोड, बीड

**ई-मेल:-** eemilsdivbeed@gmail.com **दूरध्वनी क्र.:** ०२४४२-२२२५२०

**ई-निविदा सुचना क्र.बी-१/११/ सन २०२५-२६ (फेरनिविदा-द्वितीय वेळ)**

जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, बीड हे **जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ अंतर्गत कामांसाठी** सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे उचित वर्गवारीत नोंदणीकृत कंत्राटदार यांच्याकडून खालील कामाकरिता बी-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://www/mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, बीड यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदा किंमत | महिने प्रत्येकी | निविदा फीस | कंत्राटदाराचा वर्ग | कार्यालयाचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | कुमशी सिनाब २ ता.जि.बीड | २१.८२ लक्ष | ०३ महिने | रू.२३६०/- | सु.बे.अ. साठी राखीव | जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, बीड |

ई-निविदा उपलब्ध कालावधीः- **दिनांक ०५/०१/२०२५ ते दिनांक १३/०१/२०२६**

ई निविदा उघडणे :- **दिनांक १४/०१/२०२६**

खालील ठिकाणी ई निविदाबाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.

१) संकेतस्थळ - http://mahatenders.gov.in
(सदर निविदा सूचनामध्ये काही बदल होत असल्यास वरील संकेतस्थळावर कळविण्यात येईल.)

२) सविस्तर निविदा सूचना जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, बीड यांचे कार्यालयातील सूचना फलकावर उपलब्ध आहे.

स्वाक्षरीत/-

**स.प.लब्बा**

**जिल्हा जलसंधारण अधिकारी,**
**मृद व जलसंधारण विभाग, बीड**

**जिमाका/बीड/जाहि/२०२५-२६/१७८**

## TENDER NOTICE

Government of Maharastra

Soil and Water Conservation Department

Commissioner, Soil and Water Conservation, Chhatrapati Sambhajinagar

Regional Water Conservation Officer, Soil and Water Conservation Department, Chhatrapati Sambhajinagar,

District Water Conservation Officer, Soil and Water Conservation Deparment, Beed.

**Address- Jaykwady Colony, Nagar Road, Beed**

Email Id - eemilsdivbeed@gmail.com Ph.No.02442-222520

**E-Tender Notice No.B-1/11 For Year : 2025-26** (Retender-II Call)

District Water Conservation Officer, Soil & Water Conservation Department, Beed is hereby inviting online B-1 Tenders **Under district annual Planning 2025-26 scheme** from Contractors registered with Public Works Department, Government of Maharashtra, in appropriate class for the following works.

The black B-1 tender documents are available on below mentined website.

**Main Portl :** http//:www.mahatenders.gov.in

The right to reject any or the tenders without assigning any reason whatsoever is reserved with the Competent Authority. Conditional tenders will not be accepted.

| Sr. No. | Name of Work | Tender Amount | Time Period | Tender Fees | Class of Contractor | Name o Office |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | Construction Kumashi CNB 2, Tq.Dist.Beed | 21.82 Lakh | 03 Month | Rs. 2360/- | Reserved For UEE | D.W.C.O., Soil & Water Conservation Department Beed |

Tender Sale Period :- Date 05.01.2026 to Date 13.01.2026

Tender Opening Date :- Date 14.01.2026

Detail tender notice is available

1) Web site - http://mahatenders.gov.in
(If any change in this Notice will be convey on the same website)

2) Detailed tender notice is available on the notice board of District Water Conservation Officer. Soil and Water Conservation Department, Beed.

Sign.

**(S.P.Labba)**

District Water Conservation Officer,
Soil & Water Conservaton Department, Beed

**जिमाका/बीड/जाहि/२०२५-२६/१७८**

## संपादकीय... आव्हाने पत्रकारितेपुढील...

*** सुविचार ***

**केवळ तुमच्याच अटींवर आणि तुमच्या मनासारखं आयुष्य जगायला सुरूवात करा..!**

कोकणातील सिंधुदूर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील निसर्गरम्य पोंभुर्ले गावात २० फेब्रुवारी १८१२ ला जन्मलेल्या बाळशास्त्री गंगाधरशास्त्री जांभेकर यांनी सहा जानेवारी १८३२ रोजी मराठीतील पहिले नियतकालिक सुरू केले. सुरूवातील पाक्षिक व त्यानंतर साप्ताहिक म्हणून 'दर्पण' प्रकाशित होऊ लागले. साडेआठ वर्षे हे साप्ताहिक चालले. दर्पणचा शेवटचा अंक २६ जून १८४० ला प्रकाशित झाला. त्याकाळी दर्पणचे सुमारे तीनशे वर्गणीदार होते. दर्पण बंद झाल्यानंतर श्री जांभेकर यांनी एक मे १८४० ला 'दिग्दर्शन' नावाचे मासिक सुरू केले. ते पुढे चार वर्षे चालले. इंग्रजांच्या राजवटीत जांभेकरांनी मराठीतील पहिले पाक्षिक, साप्ताहिक व मासिक सुरू केले. लोकशिक्षण, ज्ञानप्रसारासह जनजागृती करणे हा प्रमुख उद्देश समोर ठेवून या वृत्तपत्राची वाटचाल सुरू राहिली. सरकारला आवडो अथवा न आवडो दर्पणने त्याकाळी अनेक प्रश्न हाताळले. अनेक सामाजिक चळवळीला बळ दिले. त्यामुळे त्याकाळी दर्पणचा दबदबा होता.

मराठीतील 'दर्पण' हे पहिले नियतकालिक सुरू होवून आज सुमारे एकशे नव्वद वर्षे झाली आहेत. मराठी वृत्तपत्रसृष्टीला मोठा इतिहास आहे. एकट्या मराठी भाषेत आज हजारे वार्षिक, मासिक, पाक्षिक, साप्ताहिक व दैनिके प्रकाशित होतात. हे प्रगल्भ लोकशाहीचे लक्षण आहे. देश, समाजाच्या जडणघडणीत लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळख असलेल्या वर्तमानपत्रांपुढे आज अनेक आव्हाने उभी आहेत. 'मोबाईल'मुळे सर्वसामान्य लोकांच्या हाती हे समाजमाध्यम आले आहे. जगातील कुठलीही व कोणत्याही कानाकोपऱ्यात घडलेली घटना लागलीच यामुळे कळत व माहित होत असल्याने व टि.व्ही.वर दिवसभर विविध चॅनल्सवर ती प्रसारित होत असल्याने सकाळी उठल्यानंतर वर्तमानपत्र वाचण्यात अनेकांना रस उरलेला नाही. बदलती जीवनशैली, जीवनाला आलेली गती, धावपळ यामुळे वर्तमानपत्रे वाचायला अनेकांना आता वेळच नाही. मधल्या काळात टि.व्ही.वरील विविध चॅनल्सच्या प्रभावामुळे वर्तमानपत्रावर परिणाम झाला आणि आता पोर्टलमुळे! चॅनल्सपेक्षाही अधिक ताजी बातमी सर्वसामान्यांना फेसबूक, व्हॉट्सअॅपमुळे पोर्टलवर वाचायला, ऐकायला व पहायला मिळू लागली आहे. पोर्टल चालवणारेही अधिकाधिक ताजी बातमी वाचकांपर्यंत पोहंचण्यासाठी धडपडत असतात. त्यामुळे ताजी बातमी देण्यात त्यांची स्पर्धा सुरू आहे. अनेक वर्तमानत्राचेही पोर्टल निघाले आहेत. शिवाय टि.व्ही.चॅनलही आहेत. स्पर्धेच्या युगात आपले वाचक टिकून ठेवणे व ते वाढवणे याची मोठी कसरत सुरू आहे. या समाज माध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे छापल्या जाणाऱ्या वर्तमानपत्रांची सध्या मोठी दमछाक सुरू आहे. वाचक व जाहिरातींचा कमी झालेला ओघ, वाढता छपाई खर्च यामुळे वर्तमानपत्र चालवणे ते टिकून ठेवण्याचे मोठे आव्हान आज उभे आहे. यात छोटी वृत्तपत्रे तर गुदमरून जात आहेत. सरकारी जाहिरातीही वर्गवारी पद्धतीने मिळू लागल्याने व छोट्या वर्तमानपत्रांवर चोहिकडून अन्याय होतो आहे. त्यातच सरकारी जाहिरातीची बिलं वेळेवर मिळत नाहीत. त्यामुळे छोट्या वर्तमानपत्रांपुढे ती टिकवण्याचे व पुढे चालू ठेवण्याचे मोठे आव्हान आहे. त्यातच पत्रकारांवर निर्बंध व विविध माध्यमातून दबाव आणून माध्यंमाचे स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा प्रयत्न होताना दिसतो आहे.

डोंगराएवढी आव्हाने, समस्या वर्तमानपत्रापुढे आज उभ्या असल्या तरी समाजात वर्तमानपत्राची विश्वासार्हता टिकून आहे. चॅनल्सवर, पोर्टलवर बातम्या बघूनही वर्तमानपत्र वाचल्याशिवाय अनेक वाचकांचे समाधान होत नाही. कोरोना काळात वाचक संख्या घटली असली तरी आता पुन्हा ती वाढून पूर्वपदावर येत आहे. चॅनल्स, पोर्टलच्या पलिकडे जावून वेगळा विषय, एखाद्या बातमी मागची बातमी आपल्या वाचकांना देण्याचा चांगला प्रयत्न अनेक वर्तमानपत्र करत आहेत. याशिवाय केवळ बातम्या देणे एवढे या पुरते न थांबता विविध उपक्रम व कार्यक्रमही अनेक वर्तमानपत्रांकडून घेतली जातात. समाजमन बांधण्याचे आणि जोडण्याचे काम ते करतात. त्यामुळे समाज माध्यमात कितीही मोठी जीवघेणी स्पर्धा सुरू असली तरी वर्तमानपत्राचे स्थान व विश्वासार्हता कायम आहे. आव्हानांचा डोंगर पेलून पुढे येणाऱ्या समस्यांना सामोरे जावून वर्तमानपत्रांना आज वाटचाल करायची आहे. सरकार व समाजानेही लोकशाहीचा हा स्तंभ टिकून रहावा, तो भक्कम उभा रहावा म्हणून मदत करायला हवी. ***

# दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर

६ जानेवारी १८३२ रोजी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण हे नियतकालिक सुरू केले. मराठीतल्या पहिल्या वृत्तपत्राचे स्मरण म्हणून महाराष्ट्रात आपण ६ जानेवारी हा दिवस दर्पण दिन किंवा पत्रकार दिन म्हणून दरवर्षी साजरा करतो.

बाळशास्त्री जांभेकराचं आयुष्यमान कमी असलं तरी ३३ वर्षात त्यांनी अफाट कर्तृत्व गाजविलं होतं. त्यांच्यावर मराठीतून आणि अन्य भाषांमधून अनेक ग्रंथ प्रसिध्द झालेली आहेत. मात्र बाळशास्त्री यांची संक्षिप्त माहिती वाचक व नव्या पत्रकारांच्या माहितीसाठी येथे देत आहोत.

**संक्षिप्त माहिती –**

**संपूर्ण नाव** : बाळशास्त्री गंगाधरशास्त्री जांभेकर

**जन्म तारीख** : १८१२

गंगाधर शास्त्री यांना दोन मुले आणि दोन मुली होत्या. त्यातील चौथे आपत्य म्हणजे बाळशास्त्री जांभेकर

**जन्मस्थळ** : निसर्गरम्य पोंभुर्ले (ता.देवगड जि.सिंधुदुर्ग, कोकण)

**आईचे नाव** : सगुणाबाई जांभेकर

**शिक्षण** : प्राथमिक शिक्षण पोभुर्ले गावात झाले.

गंगाधर शास्त्रींसारख्या विद्ववान पित्याच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी मराठी, संस्कृतचे धडे घेतले. संत रामदास, संत तुकाराम, वामन, मोरोपंत आदिंचं काव्य, रामायण–महाभारत इतिहासातील महापुरूषांच्या कथा, मराठयांच्या इतिहासाच्या बखरी आदिंचा अभ्यास त्यांनी बालपणीच केला.आठव्या वर्षीच त्यात ते पारंग झाले. त्यानंतर वेदपठण संस्कृत स्त्रोत्र, भगवद्गीता यांच्या पाठांतराबरोबरच अमरकोश, लघुकौमुदी, पंचमहाकाव्ये इत्यादी सस्कृत अध्ययन बाराव्या वर्षीपर्यंत पूर्ण झाले. त्यांची धारणाशक्ती जबरदस्त असल्याने त्यांना बाल– बृहस्पती असे संबोधले जात असे. व्यायाम आणि सूर्यनमस्कारामुळे त्यांची शरीर संपदा चांगली होती.

**मुंबईस आगमन** : प्राथमिक शिक्षण झाल्यानंतर १८२५ च्या शेवटी बाळशास्त्री इंग्रजीचे शिक्षण घेण्यासाठी मुंबईस आले. तेथे ते बॉम्बे नेटीव्ह स्कूल या संस्थेच्या शाळेत दाखल झाले. १८३० मध्ये संस्थ डेप्युटी नेटीव्ह सेक्रेटरी म्हणून ते रूजू झाले. वेतन होते पन्नास रूपये. १८३२ मध्य नेटीव्ह सेक्रटरी म्हणून त्यांची नियुक्ती झाली. वेतन होते १०० रूपये. तेथे त्यांनी अध्यापनही केले.

**ग्रंथ संपदा** : १) नीती कथा २) सार संग्रह ३) इंग्लड देशाची बखर भाग १, व २ ४) बाल व्याकरण ५) भूगोल विद्या गणितभाग ६) भूगोलविद्येची मुलतत्वे ७) मरे यांच्या इंग्रजी व्याकरणाचा संक्षेप ८) शब्दसिध्दीनिबंध ९) समीकरणाविषयी टिपणे १०) शून्यलब्धी गणित व मूलपरिणती गणित ११) हिंदुस्थानचा इतिहास १२) इंग्रजी मराठी धातुकोश १३) पुनर्विवाह प्रकरण १४) ज्ञानेश्वरी या मौलिक श्रेष्ठ भक्तीग्रंथाचे



त्यांनी मराठीत प्रथम शिळाप्रेसवर प्रकाशन केले. वयाच्या १६ व्या वर्षापासून ते ३३ व्या वर्षापर्यंत अनेक व्याप सांभाळून त्यांनी ही ग्रंथसंपदा निर्माण केली. अनेक ग्रंथाचं भाषांतर त्यांनी केल्याने ते भाषांतरकार म्हणूनही प्रसिध्द होते.

**ओळख** : प्रकांड पंडित अशी त्याकाळात बाळशास्त्री जांभेकर यांची ओळख होती. नऊ देशी विदेशी भाषा अवगत असलेल्या बाळशास्त्री जांभेकर यांनी जसे मराठीतले पहिले वृत्तपत्र दर्पण सुरू केले त्याच पध्दतीनं अनेक अनेक पदं मराठी माणसाच्या नावावर प्रथमच नोंदविणयाचा विक्रमही त्यांच्या नावावर आहे.शिक्षण तज्ज्ञ, समाजसुधारक,स्त्री शिक्षणाचे अग्रदुत म्हणूनही त्यांची ओळख होती.त्यांच्या विद्वत्ततेमुळे समकालिन उच्चभ्रू वर्गात त्यांचा दबदबा आणि मान होता.

**दर्पण सुरु झाले** :– ६ जानेवारी १८३२ रोजी बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठीतील पहिले दर्पण हे नियतकालिक सुरू केले. त्यासाठी त्यांना रघुनाथ हरिश्चंद्रजी आणि जनार्दन वासुदेवजी यांचे सहकार्य लाभले. दर्पण अगोदर पाक्षिक होते. ४ मे १८३२ पासून म्हणजे चार महिन्यानंतर ते साप्ताहिक स्वरूपात प्रसिध्द होऊ लागले. साडे आठ वर्षानंतर म्हणजे २६ जून १८४० साली दर्पणचा शेवटचा अंक प्रसिध्द झाला. नंतर दर्पण बंद पडले. दर्पणचे वर्गणीदार तेव्हा ३०० दर्पण मराठी आणि इंग्रजीत प्रसिध्द होत असे.सरकारला आवडो अथवा न आवडो दर्पणने अनेक सामाजिक प्रश्न हाताळले.अनेक चळवळींना मदत केली. त्यामुळं दर्पणचा दबदबा होता. लोकशिक्षण आणि ज्ञानप्रसार हा दर्पणचा खऱ्या अर्थानं उद्देश होता.

**दिग्दर्शन मासिक सुरू** : दर्पण बंद पडले.मात्र लिखाणाची उर्मी बाळशास्त्रींना स्वस्थ बसू देत नव्हती.त्यामुळे त्यांनी १ मे १८४० पासून दिग्दर्शन नावाचे मासिक सुरू केले.पहिल्या मराठी मासिकाचे जनकही बाळशास्त्रीच होते. हे मासिक पुढे चार वर्षे चालले.

**पहिले असिस्टंट प्रोफेसर** : एल्फिस्टन स्कुलमध्ये नोव्हेंबर १८३४ मध्ये पहिले भारतीय असिस्टंट प्रोफेसर म्हणून त्यांची नियुक्ती केली गेली.नंतर त्यांनी अॅक्टींग प्रोफेसर म्हणूनही काम पाहिले. पितामह दादाभाई नौरोजी हे बाळशास्त्री यांचे विद्यार्थी होते.

**पहिले मराठी शिक्षणाधिकारी** : मुंबई इलाख्यातील दक्षिण विभागाचे पहिले मराठी शिक्षणाधिकारी होण्याचा मान बाळशास्त्रींच्या नावावर नोंदविला गेला आहे.

**कार्यमंत्री म्हणून नियुक्ती** : त्या काळात प्रतिष्ठित असलेल्या रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई शाखेतील भाषांतरकार समितीचे कार्यमंत्री म्हणून त्यांची १८३१ मध्ये निवड झाली. जिऑग्राफिकल सोसायटीची मुंबई शाखा सुरू झाली तेव्हा त्याचे सन्माननिय सदस्यत्व जांभेकरांना दिले गेले.

**पहिले सार्वजनिक वाचनालय**: वाचनाची आवड निर्माण व्हावी आपल्या सहकार्यांच्या मदतीने त्यांनी बॉम्बे नेटीव्ह लायब्ररी सुरू केली.भारतीय व्यक्तीने सुरू केलेले ते पहिलेच वाचनालय. लोकांनी आपली मतं निर्भिडपणे मांडावीत, विचारांचे आदान–प्रदान व्हावे यासाठी एखादे व्यासपीठ असावे असे त्यांना वाटे.त्यातून त्यांनी नेटीव्ह इंप्रुव्हमेंट सोसायटी नावाची संस्था निर्माण केली. बाळशास्त्री त्याचे पहिले अध्यक्ष. असा प्रयत्नही प्रथमच होत होता. कुलाबा वेधशाळेचेही ते संचालक होते.

**जस्टीस ऑफ द पिस** : शिक्षण, साहित्य, वृत्तपत्र, सामाजिक कार्यातील त्यांच्या् योगदानाची दखल

(उर्वरित पान ५ वर)

**'परळी परिसर'** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)

RNI No.-MAHMAR/2017/74640 Post Reg.No.LSB/BEED/RNP-265 / 2026-2028 (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) www.parliparisar.com

* वर्ष ०९ * अंक ३५ * पृष्ठ संख्या- ६ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) मंगळवार, दि. ०६ जानेवारी २०२६ * किंमत : २ रू.

# जनतेच्या पैशातून होणारी विकासकामे, दर्जेदार, गुणवत्तापूर्ण करा-उपमुख्यमंत्री अजित पवार

बीड, (जिमाका):- बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य आहे. यासाठी सर्वांची सोबत आवश्यक आहे. भारतीय संविधान, कायद्याचा आदर करत बीडकरांनी दैनंदिन जीवनात बीडच्या विकासासाठी शिस्त पाळावी, असे आवाहन जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीडवासीयांना केले.

जनतेच्या पैशातून होत असलेली विविध विकासकामे दर्जेदार व गुणवत्तापूर्ण होतील, यावर बारकाईने लक्ष द्यावे, अशा सूचनाही जिल्हा प्रशासनाला उपमुख्यमंत्र्यांनी केल्या. शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावर जिल्ह्यातील १३६३ विकासकामांचे भूमिपूजन व पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते.

जिल्हा परिषद बीड अंतर्गत जिल्हा वार्षिक योजनेतील विविध विकासकामांचे भूमिपूजन, टेनिस कोर्टाचे उद्घाटन श्री. पवार यांच्या हस्ते झाले. यासह प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत 'दिवाळी नवीन घरात' उपक्रमाचा समारोप, इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत विद्यार्थ्यांना टॅबचे वाटप, ध्वज निधी संकलनात बीड जिल्हा राज्यात प्रथम आल्याने सत्कार, आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान सोहळाही या एकाच ठिकाणी उपमुख्यमंत्री पवार यांच्या उपस्थितीत पार पडला. या कार्यक्रमास सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, खासदार बजरंग सोनवणे, सर्वश्री आमदार विक्रम काळे, प्रकाश सोळंके, सुरेश धस, संदीप क्षीरसागर, विजयसिंह पंडित, बीडच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष प्रेमलता पारवे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत



कॉवत उपस्थित होते.

श्री.पवार म्हणाले, नवीन इंग्रजी वर्षाच्या सर्वांना शुभेच्छा. येत्या नववर्षात आपणास बीडच्या विकासात अधिक भर घालायची आहे. या वर्षाच्या सुरूवातीलाच १३६३ विकासकामांनी सुरूवात झाली आहे, ही आनंदाची बाब आहे. बीड जिल्ह्यात एकाच वेळेस एवढ्या विकासकामांचे भूमिपूजन आणि उद्घाटन होत आहेत, त्यामध्ये आपणा सर्वांची साथ असल्याचेही ते म्हणाले.जिल्हा परिषद, जिल्हा सैनिक कार्यालय व इतर कार्यालयांच्या माध्यमातून जिल्ह्यात चांगले काम होत आहे. त्याला जनतेचीही साथ आहे, त्यामुळे येथील जनतेला जनतेला धन्यवाद देतो, असेही पवार म्हणाले. यासह त्यांनी जिल्ह्यात देण्यात आलेल्या भरीव निधीबाबत सविस्तर माहिती दिली. यामध्ये त्यांनी बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या नूतनीकरणासाठी निधी सह शासन मान्यता दिल्याचे आवर्जून सांगितले. बीड-परळी रेल्वे, भूसंपादनाची आवश्यकता, रेल्वेचे इलेक्ट्रीफिकेशन, ऊसतोड कामगारांसाठी उर्वरित पाच तालुक्यात वस्तीगृहे, अंबेजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रूग्णालयाचा बृहत आराखडा, सीट्रीपल आयटी, आरोग्य सुविधा वाढविण्यासाठी नियोजन, रेशीम उत्पादन भरभराटीसाठी सिल्क पार्क, विज्ञान उद्यान, तारांगण पार्क, पुरातन वास्तूंचे जतन, बीडसाठी दरदिवसाला पाणी मिळावे यासाठीचे नियोजन आदी बाबींवरही त्यांनी उपस्थितांना माहिती दिली. कार्यक्रमाची सुरवात दीप प्रज्ज्वनाने व, राष्ट्रगीत, राज्यगीताने झाली. प्रास्ताविक जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले. आभार जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव यांनी मानले. ***

(पान २ वरुन)......


## आचार्य बाळशास्त्री जांभेकर

घेऊन त्यांची त्याकाळातील बहुमानाचा जस्टिस ऑफ द पिस या पदावर नेमणूक केली गेली.त्यामुळं त्यांना हायकोर्टात ग्रॅन्ड ज्युरीमध्यम बसण्याचा अधिकार मिळाला.असे ते पहिले भारतीय. **निधन :** बाळशास्त्री जांभेकरांचे अत्यल्प वयात म्हणजे अवघ्या वयाच्या ३३ व्या वर्षी निधन झाले कोकणात काही कामानिमित्त गेले असता त्यांनी विषमज्वराने पछाडले. वेळीचऔषधोपचार झाला नाही. तापातच त्यांनी मुंबईपर्यंत प्रवास केला. १२ मे १८४६ रोजी ते मुंबईत पोहोचले. तेथे ब्रिटिश डॉक्टरांनी त्यांच्यावर उपचार केले मात्र १७ मे १८४६ रोजी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या समकालीन इंग्रजी, बंगाली, गुजराथी वृत्तपत्रांनी त्यांच्यावर मृत्यूलेख लिहिले. सुप्रिम कोर्टातही त्यांना श्रध्दांजली वाहिली गेली.

**अष्टपौलू व्यक्तीमत्व :**

जीवनाच्या विविध प्रांतात त्यांनी चौफेर कामगिरी केली. मराठी पत्रकारिता, गद्य निबंध शिक्षण, अध्यापक शास्त्र. इतिहास संशोधन, ग्रंथलेखन, सामाजिक कार्य, भाषांतर, भाषाप्रभू विविध संस्थांचे संस्थापक अशा विविध नात्यानं लोकप्रिय असलेल्या बाळशास्त्र जांभेकरांचे नाव आधुनिक महाराष्ट्राचे जनक म्हणून इतिहा नोंदविले गेले आहे. **९ भाषा अवगत :** बाळशास्त्री खऱ्या अर्थानं भाषाप्रभू होते. मराठी, संस्कृत, हिंदी, गुजराथी, कन्नड, बंगाली, या देशी भाषांबरोबरच त्यांनी ग्रीक, लॅटीन, इंग्रजी, फेंच या परदेशी भाषाही अवगत होत्या.

**- संकलन मराठी पत्रकार परिषद**




धनुभाऊ-पंकजाताईंची साथ,
आणि परळीकरांचा आशीर्वाद!
आमच्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरेल, हेच आमचे वचन.
विकासपर्व २.०
• नवनिर्वाचित नगराध्यक्षा •
सौ.पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी
नगर परिषद परळी वैजनाथ
DWARKA digital
प्रभाग क्र.१ अ
सौ.वंदना आघाव
प्रभाग क्र.१ ब
श्री.दीपक मुंडे
प्रभाग क्र.२ अ
सौ. कविता इंगळे
प्रभाग क्र.२ ब
श्री.अल्ताफ पठाण
प्रभाग क्र.४ अ
श्री.नितीन रोडे
प्रभाग क्र.४ ब
सौ.मीरा नागरगोजे
प्रभाग क्र.५ अ
सौ.जयश्री मोगरकर
प्रभाग क्र.५ ब
श्री.वैजनाथ सोळंके
प्रभाग क्र.६ अ
सौ.अंजली बनसोडे
प्रभाग क्र.६ ब
श्री.व्यंकटेश शिंदे
प्रभाग क्र.७ अ
सौ.अश्विनी केंद्रे
प्रभाग क्र.७ ब
श्री.सचिन सारडा
प्रभाग क्र.८ ब
इस्माईल मौला शेख
प्रभाग क्र.९ अ
श्री.कार्तिक कांबळे
प्रभाग क्र.९ ब
खैसर राजाखाँ पठाण
प्रभाग क्र.१० अ
सौ.सरोजा डावरे
प्रभाग क्र.१० ब
श्री.लक्ष्मण मुरकुटे
प्रभाग क्र.१० क
कुसुमताई चाटे
प्रभाग क्र.११ अ
श्री.महादेव रोडे
प्रभाग क्र.११ ब
सौ.जयश्री गित्ते
प्रभाग क्र.१२ अ
सौ.प्राजक्ता कराड
प्रभाग क्र.१२ ब
श्री.योगेश मेनकुदळे
प्रभाग क्र.१३ अ
रेश्माताई बळवंत
प्रभाग क्र.१३ ब
सौ.शिल्पा लाहोटी
प्रभाग क्र.१४ अ
श्री.पवन मुंडे
प्रभाग क्र.१४ ब
डॉ.सौ.पुजा तोतला
प्रभाग क्र.१५ अ
सौ.प्रतिक्षा देशमुख
प्रभाग क्र.१७ अ
सौ.रुपाली पवार
प्रभाग क्र.१७ ब
श्री.हाजी बाबु
परळीकरांचे त्रिवार आभार
आभारोत्सुक : महायुती-परळी वैजनाथ
नविन वर्षाच्या
हार्दिक शुभेच्छा

# सहकार भवनाचे उपमुख्यमंत्र्यानी केले भूमीपूजन शहरातील मुख्य रस्त्यावर होणार ५ मजली इमारत

बीड, (जिमाका):- शहरातील मुख्य रस्त्यालगत उभारण्यात येणा-या सहकार भवन इमारतीचा भूमीपूजन सोहळा राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पार पडला. यावेळी राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

येथील जालना रोडवर ही इमारत बांधण्यात येईल यासाठी १४ कोटी ९८ लक्ष ७९ हजार रुपये निधीची मान्यता देण्यात आली आहे. तळमजला पार्कींग व त्यावर ४ मजले अशी ही भव्य इमारत असेल. इमारतीचे एकूण क्षेत्र २३०५.१९ चौरस मीटर इतके राहणार आहे. या इमारतीमध्ये सर्व सहकार संबधित कार्यालये एकत्र येणार आहेत.



आजच्या या भूमीपूजन सोहळयास जिल्हयाचे खासदार बजरंग सोनावणे, विधान परिषद सदस्य विक्रम काळे तसेच आमदार विजयसिंह पंडीत, संदीप क्षीरसागर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतूल चव्हाण, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था सतीष तोटावर, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता रविंद्र तोंडे, विशेष लेखा परिक्षक धनंजय चव्हाण आदींची प्रमुख उपस्थिती होती.*

# राज्यभर १ ते ३१ जानेवारी २०२६ दरम्यान 'रस्ता सुरक्षा अभियान'

## 'सडक सुरक्षा-जीवन रक्षा' ही संकल्पना

मुंबई (जि.मा.का.):- रस्ते अपघातांमध्ये होणारी जीवितहानी कमी करण्यासाठी आणि नागरिकांमध्ये रस्ता सुरक्षेविषयी जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने राज्यभर १ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राष्ट्रीय रस्ता सुरक्षा महिना साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्ताने संपूर्ण राज्यात विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

या रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत परिवहन विभाग, वाहतूक पोलीस विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, शालेय शिक्षण विभाग तसेच इतर संबंधित संस्था व संघटनांच्या सहकार्याने रस्ता सुरक्षिततेसाठी प्रचार, जनजागृती व जनप्रबोधनात्मक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. नागरिक, वाहनचालक, विद्यार्थी आणि सर्व संबंधित घटकांमध्ये रस्ता सुरक्षेबाबत जागरूकता वाढविणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय (एमओरटीएच) यांच्या मार्गदर्शनानुसार या कालावधीत प्रशिक्षण कार्यक्रम, कार्यशाळा, परिसंवाद, वाहनचालक व शालेय विद्यार्थ्यांसाठी जनजागृती सत्रे, नेत्र तपासणी शिबिर तसेच विविध प्रचारात्मक उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

यावर्षीच्या राष्ट्रीय रस्ता सुरक्षा महिन्याची संकल्पना सडक सुरक्षा जीवन रक्षा अशी असून रस्ता सुरक्षा ही प्रत्येकाच्या जीवनरक्षणाशी निगडित आहे, हा संदेश सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यावर भर देण्यात येणार आहे. राज्यभर राबविण्यात येणाऱ्या या अभियानामुळे रस्ता सुरक्षा नियमांचे पालन वाढेल आणि अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल, अशी अशा परिवहन आयुक्त, मुंबई यांनी व्यक्त केली आहे. ***

**सा.परळी परिसर वार्षिक वर्गणीदार व्हा..!**
**-अंकासाठी संपर्क-**
**मो.९४२२३२८४९३**

# अपक्ष नगरसेवक लक्ष्मण मुरकुटे, इस्माईल शेख (मंगल दादा), महेंद्र रोडे यांचा धनंजय मुंडेंच्या नेतृत्वात राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षात प्रवेश



परळी वैजनाथ (बातमीदार):- परळी नगर परिषद निवडणुकीत अपक्ष म्हणून निवडून आलेले नगरसेवक लक्ष्मण मुरकुटे, इस्माईल शेख (मंगलदादा) तसेच अर्चना रोडे यांचे पती महेंद्र रोडे यांनी राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे नेते, माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षात प्रवेश केला असून, त्यांनी राष्ट्रवादी कॉँग्रेस व महायुतीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ.पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांना जाहीर पाठिंबा दिला आहे.

नगर परिषद निवडणुकीत धनंजय मुंडे यांच्या सह मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली परळी नगर परिषद निवडणुकीत एकहाती सत्ता मिळवली होती. त्यानंतर अपक्ष म्हणून निवडून आलेल्या तीन नगर सेवकांनी जाहीर पक्ष प्रवेश केला आहे. याप्रसंगी जिल्हा परिषद गटनेते अजय मुंडे, बाजीराव भैय्या धर्माधिकारी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे, यांच्यासह स्थानिक पदाधिकारी आदी उपस्थित होते.**

# ओपन नॅशनल चॅम्पियनशिप मध्ये परळीच्या समर्थ धोकटेने मिळवले सुवर्णपदक

परळी वैजनाथ, (बातमीदार):- युवा आणि क्रीडा विकास संघटना (भारत) यांच्यावतीने अमृतसर पंजाब येथे आयोजित करण्यात आलेल्या ओपन नॅशनल चॅम्पियनशिप २०२५ मध्ये परळीच्या मुलाने भरीव कामगिरी केली असून राष्ट्रीय स्तरावरील योगासन स्पर्धेत त्याने प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदक जिंकले आहे. या यशाबद्दल त्याचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

युवा आणि क्रीडा विकास संघटना (भारत) यांच्या वतीने अमृतसर (पंजाब) येथे ३० व ३१ डिसेंबर २०२५ रोजी ओपन नॅशनल चॅम्पियनशिप २०२५ स्पर्धा घेण्यात आल्या.




राष्ट्रीय स्तरावरील या स्पर्धेत महाराष्ट्रातून स्पर्धक म्हणून सहभागी स्पर्धक समर्थ मनोज धोकटे याने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक मिळवून सुवर्णपदक पटकावले. राष्ट्रीय स्तरावर झालेल्या या स्पर्धेत देशभरातून स्पर्धक सहभागी झाले होते. या स्पर्धेत समर्थ धोकटे याने सुवर्णपदक पटकावत परळीचे नाव उंचावले आहे. परळी येथील व्यावसायिक मनोज धोकटे यांचा तो मुलगा असून कैलास विष्णुपंत धोकटे यांचा समर्थ हा पुतण्या आहे. या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत देशभरातून अनेक खेळाडूंनी सहभाग घेतला होता. अत्यंत चुरशीच्या स्पर्धेत समर्थ मनोज धोकटे याने आपल्या कौशल्य, सातत्यपूर्ण सराव आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश संपादन केले. त्याच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. ***

# परळी शहर व तालुका पत्रकार संघाचे दर्पण दिन पुरस्कार जाहीर

## लक्ष्मण वाकडे, ओमप्रकाश बुरांडे, आत्मलिंग शेटे, धनंजय आरबुने, धनंजय आढाव, प्रा.प्रवीण फुटके यांचा होणार गौरव








परळी वैजनाथ, (बातमीदार):-

परळी शहर व तालुका पत्रकार संघाच्या वतीने दर्पण दिनानिमित्त दिले जाणारे विविध स्मृती पुरस्कार जाहीर करण्यात आले असून येत्या मंगळवारी (दि.६) या पुरस्काराचे वितरण होणार आहे.

परळी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील विशेष शासकीय विश्रामगृहात भव्य पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष रानबा गायकवाड, तालुका कार्याध्यक्ष नितीन ढाकणे, शहराध्यक्ष शेख मुकरम व सल्लागार भगवान साकसमुद्रे यांनी दिली.

दर्पण दिनाच्या निमित्ताने पत्रकारितेतील उल्लेखनीय कार्याची दखल घेत दिवंगत ज्येष्ठ पत्रकारांच्या स्मरणार्थ दिले जाणारे स्मृती पुरस्कार यंदा मान्यवर पत्रकारांना प्रदान करण्यात येणार आहेत. यामध्ये भास्करराव जोशी स्मृती जगमित्र पुरस्कार- दैनिक पुढारी प्रतिनिधी तथा ज्येष्ठ पत्रकार लक्ष्मण वाकडे, एम.पी.कनके स्मृती पुरस्कार-परळी समाचारचे संपादक ज्येष्ठ पत्रकार आत्मलिंग शेटे, प्रकाश नव्हाडे स्मृती पुरस्कार-दैनिक मराठवाडा साथीचे ज्येष्ठ पत्रकार ओमप्रकाश बुरांडे, मोहनलालजी बियाणी स्मृती पुरस्कार-दैनिक दिव्य मराठीचे पत्रकार धनंजय आढाव, दिवंगत प्रशांत जोशी स्मृती पुरस्कार-दैनिक पुण्यनगरीचे पत्रकार धनंजय आरबुने, कैलास शर्मा स्मृती पुरस्कार-दैनिक सकाळचे पत्रकार प्रा.प्रवीण फुटके, यांना पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

या गौरव सोहळ्यास त्रिपुरा विद्यापीठाचे माजी कुलगुरू तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वृत्तपत्र विभागाचे माजी विभाग प्रमुख, प्रसिद्ध विचारवंत प्रा.डॉ.वि.ल.धारुरकर, आमदार धनंजय मुंडे, नगराध्यक्षा पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, ज्येष्ठ नेते प्रा.टी.पी.मुंडे, राष्ट्रवादी कॉँग्रेसचे राजेभाऊ फड, मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे, पोलिस निरीक्षक धनंजय ढोणे, रघुनाथ नाचन, नायब तहसीलदार परवीन पठाण, अल्ट्राटेक सिंमेट कंपनीचे जनसंपर्क अधिकारी कुलदिप खोब्रागडे, यांच्यासह मुख्य अभियंता सुनील इंगळे, मिलिंद घाडगे, बहादूरभाई, दिपक देशमुख, अनंत इंगळे आदी मान्यवरांची उपस्थिती लाभणार असून, त्यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह व सन्मानपत्र प्रदान करून पुरस्कारार्थी पत्रकारांचा यथोचित गौरव करण्यात येणार आहे. दर्पण दिन सोहळा म्हणजे पत्रकारितेतील मूल्य, निष्ठा आणि सामाजिक बांधिलकीचा गौरव असल्याचे सांगत, या कार्यक्रमास परळी शहर व तालुक्यातील पत्रकार बांधव, सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन तालुकाध्यक्ष रानबा गायकवाड, तालुका कार्याध्यक्ष नितीन ढाकणे, शहाध्यक्ष शेख मुकरम यांच्यासह परळी शहर व तालुका पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे. ***